**राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दिनांक: ३० जून, २०२२

<u>वाचा:</u>

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ , दिनांक ०१ जुलै,२०१६.
२. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट,२०१६.
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ , दिनांक १७ मार्च, २०१७.
४. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ , दिनांक २७ मार्च, २०१७.
५. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७.
६. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५ नोव्हेंबर,२०१७.
७. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १६ नोव्हेंबर,२०१७.
८. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च,२०१९
९. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर,२०१९

**शासन निर्णय:**

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षणाबाबतचे सुधारीत धोरण संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०१ जुलै,२०१६ च्या शासन निर्णयान्वये विहीत केले आहे. या अनुषंगाने उक्त शासन निर्णयातील परिच्छेद ५ मध्ये क्रीडा प्रमाणपत्र वैधता पडताळणी करण्याची कार्यपद्धती विशद करण्यात आली आहे. संदर्भाधीन क्र.८ येथील दि.११.०३.२०१९ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये तसेच संदर्भाधीन क्र.९ येथील दि.२४.१०.२०१९ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये आदेश देण्यात आले आहेत. नोकरीमधील

खेळाडूंच्या ५ टक्के आरक्षणाअंतर्गत अर्ज केलेल्या व शिफ़ारस झालेल्या उमेदवारांपैकी काही उमेदवारांना संबंधित खेळाचे जुजबी ज्ञान व त्या खेळाची किमान कौशल्ये देखील अवगत नसल्याची बाब आढळून आली. त्याच प्रमाणे काही उमेदवारांना संबंधित स्पर्धेच्या पुर्वतयारीचे ठिकाण, क्रीडा मार्गदर्शक, संघ सहकाऱ्यांची नाव, इ. बाबतची समाधनकारक माहिती देता आली नाही. या अनुषंगाने वैध उमेदवारांवर अन्याय होऊ नये व बोगस खेळाडू प्रमाणपत्रांना आळा घालणे यासाठी ५ टक्के खेळाडू आरक्षणांतर्गत शिफ़ारस झालेल्या उमेदवारांचे, क्रीडा प्रात्यक्षिके व कौशल्य चाचणी घेण्याचे आदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. संदर्भाधीन क्र.८ व क्र.९ येथील अनुक्रमे दि. ११.०३.२०१९ व दि.२४.१०.२०१९ ची शासन शुद्धीपत्रे अधिक्रमित करण्यात येत आहेत. दिनांक ०१ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ व त्यामधील नमूद सर्व तरतुदी वगळून त्याऐवजी खालील परिच्छेदांचा नव्याने समावेश करण्यात येत आहे:-

***परिच्छेद क्र. ५***

*I. संबंधित खेळाडूने करावयाची कार्यवाही:-*

साधारणपणे खेळाडूने खेळविषयक प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदरचे प्रमाणपत्र छाननी करण्यासाठी खेळाडू ज्या विभागात वास्तव्यास आहे,त्या विभागीय उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे पाठवावे. मात्र परीक्षार्थी खेळाडू उमेदवाराने, ज्या पदाच्या निवडीकरिता दोन किंवा त्यापेक्षा जास्त टप्प्यांवर परीक्षा आयोजित केल्या जातात अशा पदासाठीच्या पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकाआधी किंवा ज्या पदासाठी एकाच टप्प्याची परीक्षा आयोजित केली जाते अशा पदाच्या परीक्षेसाठी अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकाआधी, तो ज्या क्रीडा विभागात वास्तव्यास आहे त्या विभागातील उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांचेकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केलेला असणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडूने कोणत्या विभागातील उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केला आहे हे आवेदन अर्जात नमूद करणे व अर्ज सादर केल्याची पोच पावती सोबत जोडणे बंधनकारक आहे. उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून आधीच प्रमाणपत्र पडताळणी करून घेतलेल्या उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील. ज्या पदांवरील निवडीसाठी उमेदवाराची मुलाखत घेण्यात येते, अशा पदांच्या मुलाखतीवेळी संबंधित खेळाडूकडे क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल असणे बंधनकारक आहे अन्यथा सदर उमेदवार, खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही. खेळाडू उमेदवाराने, क्रीडा प्रमाणपत्रासंदर्भात कोणतीही बनावट कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास अशा उमदेवाराविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात येईल.

II. *<u>संबंधित खेळाच्या अधिकृत संघटना / संबंधित शासकीय कार्यालयांनी करावयाची कार्यवाही:-</u>*

अधिकृत एकविध संघटनेच्या प्रमाणपत्राची छाननी तसेच आदिवासी,अपंग क्रीडा स्पर्धेच्या, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या प्रमाणपत्रांची छाननी संबंधित विभागीय उपसंचालक यांना करता यावी याकरिता संबंधित खेळाच्या संघटनांनी स्पर्धांचे अभिलेख व्यवस्थितरित्या जतन करावेत व स्पर्धेचे आयोजन संपन्न झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीत, त्या स्पर्धेतील खेळाडूंचे संपूर्ण अभिलेख संबंधित संघटनेच्या विद्यमान अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने व शिक्क्याने, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे पाठविणे आवश्यक राहील.

राष्ट्रीय स्तरावर आयोजित होणाऱ्या क्रीडा स्पर्धांचे निकाल, संबंधित राज्य संघटनेने राष्ट्रीय संघटनेशी समन्वय करुन, राष्ट्रीय संघटना सचिवांच्या सही व शिक्क्यानिशी क्रीडा व युवक सेवा संचालनालयास, राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाल्यानंतर ३० दिवसात सादर करावेत. राज्य व राष्ट्रीय स्पर्धांचे निकाल क्रीडा व युवक सेवा संचालनालयास पाठविण्याची जबाबदारी राज्य संघटनेची राहील.

संबंधित स्पर्धा आयोजन करणाऱ्या संस्था /क्रीडा संघटना/संबंधित शासकीय विभाग यांनी खेळाडूच्या प्राविण्य निश्चितीच्या अनुषंगाने कागदपत्रे/पुरावे विहित नमुन्यात व विहीत कालावधीत पोहोचते करण्याची दक्षता घ्यावी.

विहीत मुदतीत आवश्यक अभिलेख आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना उपलब्ध करुन न दिल्यास संबंधित खेळाडूला त्याच्या प्रमाणपत्राचा पडताळणी अहवाल पाठविणे शक्य होणार नाही व यामुळे खेळाडूच्या होणाऱ्या नूकसानीस संबंधित संस्था/खेळ संघटनाच जबाबदार राहील.

III. *<u>संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी करावयाची कार्यवाही:-</u>*

उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांना खेळाडू प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून यांच्याकडून प्राविण्य निश्चितीसाठी आवश्यक अभिलेख ३ कार्यालयीन दिवसात मागविणे आवश्यक राहील. क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फ़त अभिलेख प्राप्त झाल्यानंतर, त्याआधारे संबंधीत उपसंचालक, उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांनी ८ कार्यालयीन दिवसात कार्यवाही करून क्रीडा प्रमाणपत्र अहवाल देण्याची अथवा नाकारण्याची कारणे नमूद करून, संबंधित खेळाडूंना अवगत करण्याची कार्यवाही करावी. खेळाडूचे प्रमाणपत्र पडताळणीसाठी उपलब्ध झाल्यानंतर कार्यालयीन २० दिवसात प्रमाणित करून संबंधित खेळाडूस प्रमाणपत्र पडताळणी अहवाल उपलब्ध करून देणे संबंधीत उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांच्यावर बंधनकारक राहील. सदरचा अहवाल/निर्णय उपसंचालक,क्रीडा यांनी संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक राहील. जेणेकरुन भविष्यात खेळाडूच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यास

क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल तात्काळ उपलब्ध करून देता येईल.उमेदवाराच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद वाटणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशाप्रकारची ठोस कारणे असलेल्या प्रकरणी, या शासन निर्णयातील नमूद परिच्छेद क्र.५.१.१ मध्ये नमूद केलेल्या उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर उमेदवारास उपस्थित राहण्याबाबत सूचीत करता येईल. सदर खेळाडूची कौशल्य चाचणी, प्रात्यक्षिके यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे आवश्यक वाटल्यास, त्याबाबत संबंधित विभागीय उपसंचालक स्तरावार निर्णय घेता येईल. शासन सेवेत निवड झालेल्या खेळाडू उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणीस विलंब झाल्यास व त्यामुळे नियुक्ती देण्यास उशीर झाल्यास अथवा नियुक्तीसंदर्भात न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास, उपसंचालक,क्रीडा यांना जबाबदार धरून त्यांच्या विरुद्ध चौकशी करुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

IV. *<u>महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने/निवड मंडळाने/शासनाच्या विविध विभागांच्या निवड प्राधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही :-</u>*

खेळाडू प्रवर्गातून प्राप्त झालेल्या अर्जासोबत योग्य क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरिता केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास परीक्षेच्या पहिल्या टप्प्यातच अर्ज नाकारण्यात यावेत. ज्या पदांवरील निवडीसाठी उमेदवाराची मुलाखत घेण्यात येते, अशा पदांच्या मुलाखतीवेळी संबंधित खेळाडूकडे क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल असणे बंधनकारक आहे. निवड प्राधिकाऱ्यांनी, खेळाडू प्रवर्गातून नियुक्तीसाठी पात्र असलेल्या खेळाडूंबाबत, त्या खेळाडूने आवेदन अर्जासोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे/माहिती यासह परीक्षेचा निकाल संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळवावा.

V. *<u>नियुक्ती प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही:-</u>*

महाराष्ट्र लोकसेवा आयोग/निवड मंडळ/संबंधित निवड प्राधिकारी यांनी खेळाडू प्रवर्गातून शिफ़ारस केलेल्या उमेदवारांची क्रीडा प्रमाणपत्रे पुनर्पडताळणीसाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य , पुणे यांच्याकडे पाठवावित. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी वैध खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल दिल्याशिवाय संबंधीत उमेदवारास शासन सेवेत नियुक्ती दिली जाणार नाही, याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. यानुसार कार्यवाही न केल्यास व त्यामुळे भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याकरिता संबंधित नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.

VI. *<u>आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांनी करावयाची कार्यवाही-</u>*

राज्यस्तरीय/राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजन संपन्न झाल्यानंतर संबंधित खेळाच्या राज्य संघटनेकडून प्राप्त झालेल्या निकालाची/अभिलेखाची छाननी करुन सदरचा

निकाल, सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या कार्यालयाकडे गुगल ड्राईव्ह/गुगल क्लाऊड द्वारे उपलब्ध करुन देण्यात यावा. विहीत मुदतीत स्पर्धेचा निकाल/अभिलेख जमा न करणाऱ्या संघटनांना, स्पर्धेबाबतचा अभिलेख जमा करण्याबाबत तीन वेळा पत्राद्वारे सूचित करण्यात यावे. तदनंतरही संघटनेकडून अभिलेख प्राप्त न झाल्यास, खेळाडूच्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या संबंधित खेळाच्या राज्य व राष्ट्रीय संघटनांची संलग्नता रद्द करण्याची शिफ़ारस अनुक्रमे महाराष्ट्र ऑलिम्पीक असोसिएशन व इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन यांना संचालनालय स्तरावरुन करण्यात यावी. तसेच संबंधीत संघटनांनी आयोजित केलेल्या स्पर्धांना शासकीय लाभ अनुज्ञेय करण्यात येऊ नयेत.

संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून, खेळाडू प्रवर्गातून शिफ़ारस झालेल्या उमेदवारांचे क्रीडा प्रमाणपत्र, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे पुनर्पडताळणीसाठी प्राप्त झाल्यावर, सदर प्रमाणपत्रांच्या पात्र अपात्रतेसंदर्भात, संबंधीत नियुक्ती प्राधिकाऱ्यांना व संबंधित खेळाडूस १५ दिवसांच्या आत अवगत करण्यात यावे. तसेच खेळाडू प्रमाणपत्र पडताळणीसंदर्भात प्राप्त होणाऱ्या द्वितीय अपीलावर सुनावणीचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे, बोगस खेळाडू प्रमाणपत्रांच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनूषंगाने, संबंधित उमेदवाराची प्रात्यक्षिक व कौशल्य चाचणी घेण्याचे, त्यानुसार संबंधित उपसंचालक, क्रीडा यांनी दिलेल्या पडताळणी अहवाल रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील. तसेच शासन सेवेत यापुर्वी निवड/नियुक्ती झालेल्या उमेदवारांच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद असणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशा स्वरुपाची ठोस कारणे असलेल्या प्रकरणी, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना संबंधित उमेदवारांच्या क्रीडा प्रमाणपत्रांसंदर्भात सखोल तपासणी करण्यासाठी कौशल्य चाचणी तसेच प्रात्यक्षिके घेता येतील,या संदर्भात आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांचा निर्णय अंतीम राहिल. सदर खेळाडूंची कौशल्य चाचणी, प्रात्यक्षिके यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना बंधनकारक असेल.

तसेच खेळाडू प्रमाणपत्र वैध ठरलेल्या खेळाडूंच्या नावाची अद्ययावत यादी वेळोवेळी क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर विभागनिहाय प्रसिद्ध करण्याची जबाबदारी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाची राहील.

***परिच्छेद क्र.५.१***

क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद असणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशा स्वरुपाच्या प्रकरणी क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीच्या वैधता तपासणी संदर्भात विविध समित्यांचे गठण व त्यांची कार्यकक्षा खालीलप्रमाणे ; -

१. *विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखालील समिती*-

संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी प्रकरणे सादर करणाऱ्या उमेदवाराच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद असणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशा स्वरुपाची ठोस कारणे असलेल्या प्रकरणी, क्रीडा प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीचे गठण करण्यात येत आहे-

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा | अध्यक्ष |
| २ | संबंधित विभागातील (Division) एक जिल्हा क्रीडा अधिकारी | सदस्य |
| ३ | संबंधित खेळातील एक क्रीडा मार्गदर्शक/क्रीडा प्रशिक्षक | सदस्य |
| ४ | संबंधित खेळातील राष्ट्रीय स्तर/ राज्यस्तर विजेता अथवा अर्जुन पुरस्कारार्थी खेळाडू | सदस्य |

वरील समितीमधील अ.क्र.२,३ व ४ येथील सदस्यांची निवड करण्याचे अधिकार समिती अध्यक्षांना राहतील. तसेच अ.क्र. ३ व ४ येथील सदस्यांचा कमाल कालावधी ५ वर्षे राहील.

संबंधित खेळाडूला प्रमाणपत्र पडताळणीबाबत अहवाल देण्यासाठी, संबंधीत खेळाडूची/उमेदवाराची आवश्यकतेनुसार क्रीडा कौशल्य चाचणी, संबंधित खेळाची प्रात्यक्षिके घेण्याचा/क्रीडा विषयक संबंधित कागदपत्रे तपासण्याचा अधिकार उक्त समितीस असेल. सदर समितीने खेळाडूच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्र अपात्रतेसंदर्भात स्वयंस्पष्ट कारणे नमूद करुन समितीच्या निर्णयाबाबत, संबंधितांना अवगत करावे. उपरोक्त समितीसमोर सादर होणाऱ्या प्रकरणांमध्ये संबंधीत उमेदवारास प्रात्यक्षिके करण्यास व कौशल्य चाचणीस हजर राहण्याच्या दोन संधी उपलब्ध करुन दिल्या जातील. सदर संधींमध्ये समितीसमोर गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना खेळाडू आरक्षणांतर्गत अपात्र ठरवता येईल.

२. *सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखालील समिती-*

संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या निर्णयाविरुद्ध प्रथम अपिल सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे करता येईल. उमेदवाराच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद असणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल

देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशा स्वरुपाची ठोस कारणे असलेल्या प्रकरणी तसेच संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध दाखल प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सखोल तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीचे गठण करण्यात येत आहे-

| | | |
|---|---|---|
| १ | सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे | अध्यक्ष |
| २ | संबंधित खेळाचा क्रीडा मार्गदर्शक/क्रीडा प्रशिक्षक | सदस्य |
| ३ | संबंधित खेळाचा राष्ट्रीयस्तर/ राज्यस्तर विजेता/ अर्जुन पुरस्कारार्थी खेळाडू | सदस्य |

वरील समितीमधील अ.क्र. २ व ३ येथील सदस्यांची निवड करण्याचे अधिकार समिती अध्यक्षांना राहतील. हे दोन सदस्य उपरोक्त परिच्छेद अ.क्र.५.१.१ मधील समितीतील असणार नाहीत. तसेच सदर सदस्यांचा कमाल कालावधी ५ वर्षे राहील.

संबंधित खेळाडूला प्रमाणपत्र पडताळणीचा वैध अहवाल देण्यासाठी, संबंधीत खेळाडूची/उमेदवाराची आवश्यकतेनुसार क्रीडा कौशल्य चाचणी, संबंधित खेळाची प्रात्यक्षिके घेण्याचा/क्रीडा विषयक संबंधित कागदपत्रे तपासण्याचा अधिकार उक्त समितीस असेल. सदर समितीने खेळाडूच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्र-अपात्रतेसंदर्भात ठोस कारणे नमूद करुन समितीच्या निर्णयाबाबत, संबंधितांना अवगत करावे. उपरोक्त समितीसमोर सादर होणाऱ्या प्रकरणांमध्ये संबंधीत उमेदवारास प्रात्यक्षिके करण्यास व कौशल्य चाचणीस हजर राहण्यासाठी दोन संधी उपलब्ध करुन दिल्या जातील. सदर संधींमध्ये समितीसमोर गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना खेळाडू आरक्षणांतर्गत अपात्र ठरवता येईल.

*३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखालील समिती-*

सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या निर्णयाविरुद्ध द्वितीय अपिल आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडे करता येईल उमेदवाराच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद असणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशी ठोस कारणे असलेल्या प्रकरणी तसेच संबंधित सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध दाखल द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने सखोल तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीचे गठण करण्यात येत आहे-

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे | अध्यक्ष |
| २ | विभागीय उपसंचालक (मुख्यालय), क्रीडा व युवक सेवा, पुणे | सदस्य |
| ३ | संबंधित खेळातील वरिष्ठ क्रीडा मार्गदर्शक/क्रीडा प्रशिक्षक | सदस्य |
| ४ | संबंधित खेळातील आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेता खेळाडू | सदस्य |

वरील समितीमधील अ.क्र. ३ व ४ येथील सदस्यांची निवड करण्याचे अधिकार समिती अध्यक्षांना राहतील. हे सदस्य उपरोक्त परिच्छेद अ.क्र.५.१.१ व अ.क्र.५.१.२ मधील समितीतील असणार नाहीत. तसेच सदर सदस्यांचा कमाल कालावधी ५ वर्षे राहील.

संबंधित खेळाडूचा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल देण्यासाठी, संबंधीत खेळाडूची/उमेदवाराची क्रीडा कौशल्य चाचणी, संबंधित खेळाची प्रात्यक्षिके घेण्याचा/क्रीडा विषयक संबंधित कागदपत्रे तपासण्याचा अधिकार उक्त समितीस असेल. सदर समितीने खेळाडूच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्र-अपात्रतेसंदर्भात ठोस कारणे नमूद करुन समितीच्या निर्णयाबाबत, संबंधितांना अवगत करावे. उपरोक्त समितीसमोर सादर होणाऱ्या प्रकरणांमध्ये संबंधीत उमेदवारास प्रात्यक्षिके करण्यास व कौशल्य चाचणीस हजर राहण्यासाठी दोन संधी उपलब्ध करुन दिल्या जातील. सदर संधींमध्ये समितीसमोर गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना खेळाडू आरक्षणांतर्गत अपात्र ठरवता येईल.

संबंधीत निवड प्राधिकाऱ्यांकडून, खेळाडू आरक्षणामधून शिफ़ारस झालेल्या उमेदवारांच्या क्रीडा प्रमाणपत्रांची पुनर्पडताळणीसाठी करण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रकरणांची पडताळणी १५ दिवसांमध्ये करुन, संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना अवगत करण्यात येईल.

***<u>परिच्छेद क्रमांक ५.२ अपीलाबाबतच्या तरतूदी-</u>***

संबंधित विभागीय उपसंचालक यांच्यामार्फत कळविण्यात आलेल्या निर्णयावर खेळाडूला आक्षेप असल्यास याबाबत निर्णय प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खेळाडूस सहसंचालक,क्रीडा व युवक सेवा,शिवछत्रपती क्रीडा संकुल,म्हाळुंगे बालेवाडी,पुणे यांच्याकडे प्रथम अपील करता येईल. यानुसार प्राप्त होणाऱ्या अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देण्याची कार्यवाही सहसंचालक,क्रीडा व युवक सेवा हे १५ दिवसांच्या कालावधीत करतील. सहसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांच्या निर्णयावर आक्षेप असल्यास, सदर निर्णय प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत

आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांच्याकडे द्वितीय अपील करता येईल.सदर अपीलावर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा हे १५ दिवसांच्या कालावधीत निर्णय घेतील.

५.३. संबंधित विभागीय उपसंचालक यांनी पडताळणी केलेल्या क्रीडा प्रमाणपत्रासंदर्भात माहिती क्रीडा विभागाच्या संकेत स्थळावर अपलोड करावी.

५.४ एखाद्या खेळाडूकडे एकापेक्षा जास्त खेळांची राज्य/राष्ट्रीय स्पर्धांची प्राविण्य प्रमाणपत्रे असतील, अशा खेळाडूने एकाच वेळेस सर्व प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित उपसंचालक यांच्याकडे सादर करावीत. संबंधित पदाच्या भरतीसाठी सादर केलेल्या अर्जात, खेळाडूने जे प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांना पडताळणीसाठी सादर केली असल्याचे नमूद केले असेल केवळ त्याच प्रमाणपत्रांच्या पात्रतेचा अहवाल नियुक्तीच्या पुढील प्रयोजनार्थ गृहीत धरला जाईल. या तरतुदीखेरीज अन्य खेळातील आणि परीक्षेच्या अन्य कोणत्याही टप्प्यावर सादर करण्यात येणारे खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल कोणत्याही परिस्थितीत ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

५.५. संबंधित पदाच्या भरतीसाठी जाहिरात आल्यास, खेळाडू प्रवर्गातून अर्ज करताना खेळाडूने उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणी करून मिळण्याबाबत केलेल्या अर्जाची पोच पावती अथवा खेळाडूस उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्राप्त झालेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल जोडणे बंधनकारक आहे.अर्जासोबत उपरोक्त तपशील सादर न करणाऱ्या उमेदवारांचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फ़त/निवड मंडळ/नियुक्ती प्राधिकारी यांच्यामार्फ़त होणाऱ्या तसेच अन्य सर्व पदभरतीसाठी सदर कार्यपद्धती लागू राहील.

५.६ सदर शासन निर्णयातील तरतूदी तात्काळ अंमलात येतील.

५.७ शासनाने उपरोक्त प्रमाणे केलेल्या सुधारणांना वर्षातून दोन वेळा विस्तृत प्रमाणावर प्रसिद्धी देण्याची कार्यवाही आयुक्त,क्रीडा व युवक सेवा यांनी करावी व यानुसार केलेल्या कार्यवाहीबद्दल शासनास वेळोवेळी अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०६३०१५४३३४३६२१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL SURYAKANT HANJE

Digitally signed by SUNIL SURYAKANT HANJE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=b52de42797ba0b88d4615daa9566ad8fa49d50637950208576d69ab9dba313a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=345A2816550FE595955B31526C8E1A31863F6F9DC898D91E4543436BE8B73FDA, cn=SUNIL SURYAKANT HANJE
Date: 2022.06.30 15:46:03 +05'30'

**(सुनिल हंजे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्र्याचे सचिव

३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे
६. संचालक, शिक्षण (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
९. लोकायुक्त, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मुंबई
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर
११. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
१३. सर्व मंत्रालयीन विभाग
१४. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६. सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद
१७. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय,मुंबई
१९. निवड नस्ती, क्रीयुसे-२